## असे एकदा व्हावे ....

असे एकदा व्हावे, तू अवचित मज भेटावे
रस्त्याच्या रूक्ष खुणांनी, रंग गुलाबी ल्यावे !

त्या उन्हातही भासावे, पवनाचे थंड शहारे
मन धारांनी प्रेमाच्या, आनंदे चिंब भिजावे !

घोळके माणसांचे, मग धूसर धूसर व्हावे
आवाज वाहनांचे, संगीत मधूर वाटावे !

मग अल्लड स्वप्नांनीही, गाण्यावर फेर धरावे
बेधुंद त्या क्षणाला, नयनांशी नयन भिडावे !

आवेगी आतूर देही, जणु मोरपंख पसरावे
बेभान होऊनी अवघे, भाव विश्व नाचावे !

असे एकदा व्हावे, तू अवचित मज भेटावे
भेटुनी परी माघारी, कधी कधी ना जावे !

असे एकदा व्हावे ....

**© प्रीती देशपांडे**

www.meetipreeti.com